
सुराज्य सोलापूर

# दीपोत्सव

मंगळवार, दि. १४ नोव्हेंबर २०२३

# मनात संवेदनेची धाकटी ज्योत तरी पेटायला हवी!

> ज्या दिवशी आपण दिवाळी साजरी करून सर्व प्रकारचा आनंद लुटतो, विद्युत रोषणाईने सर्व परिसर चंदेरी झगमगाटात उजळून टाकतो, त्याच वेळी कित्येकांच्या घरात साधी पणतीही प्रकाशित झालेली नसते त्यांचे काय? तुकोबांच्याच भाषेत सांगायचे झाले तर समाजातील रंजलेल्या, गांजलेल्या, कष्टलेल्या, लोकांप्रती आपल्या मनात संवेदनेची धाकटी ज्योत तरी पेटायला नको का? अशा वंचित लोकांच्या जीवनात थोडा तरी ज्ञानाचा, सहानुभूतीचा प्रकाश पेरण्याचे काम जेव्हा होईल, तेव्हाच खऱ्या अर्थाने सम तेची दिवाळी साजरी होईल!



दीपावली हा सण भारतीय संस्कृतीतील सर्वात मोठा सण! आनंद, उत्साह, चैतन्य, स्नेह व समाधानाचे प्रतीक म्हणजे दिवाळी! आपली संस्कृती ही पुराणकाळापासून तेजोनिधी प्रकाशाचे पूजन करणारी संस्कृती आहे. प्रकाश म्हणजे सत्याचे व ज्ञानाचे प्रतीक!

विश्वानिर्मितीचा आरंभ व चिरंतन सत्य म्हणजे प्रकाश! प्रकाशाच्या अस्तित्वाशिवाय चैतन्य नाही. अनंत अवकाशाचा संपूर्ण परीघ या प्रकाशरूपी तत्वाने व्यापलेला! प्रकाशाच्या अनुपस्थितीने अवघी जीवसृष्टी मंदावते नव्हे थांबते! या कारणानेच विश्वातील सर्व प्राणीमात्र व माणूस नेहमीच सदैव प्रकाशाच्या शोधात असतो, पण सर्व प्राणीमात्रांमध्ये माणसानेच फक्त या तत्त्वातून ज्ञानाचा शोध घेतला. प्रकाशाच्या उगमाने सर्व प्रकारच्या अंधाराचा नायनाट होऊन सृष्टीतील दिनक्रम चालू होतो मग तो प्रकाश तेजोरूपी सूर्याचा असो की, त्या तत्वातील धाकुट्या पणतीचा.

'जैसी दीपकळीका धाकुटी । परी बहु तेजाने प्रकटी ।' तेजाचे प्रकटीकरण हा प्रकाशाचा स्थायी भावच असतो.. समर्थ रामदास म्हणतात याकारणे सूर्यापुढे । दुसरी साम्या न घडे । जयाच्या प्रकाशे उजडे । प्राणीमात्रासी ।' ज्याप्रमाणे सूर्य उगवला की अंधाराचे घनदाट जाळे विरून सर्व आकाश मोकळे होते तद्वतच आपल्या जीवनातील आणि अंतर्मनातील प्रकाशाच्या आगमनानेही सर्व प्रकारच्या तिमिराचा लोप होतो. आपल्या स्वस्वरूपाचे ज्ञान झाले की मी तू पणाचे भेदही मावळतात आणि खऱ्या अर्थाने सत्याचे ज्ञान होते. अहंतेचा अंध:कार दूर झाला की व्यक्ती सोहमध्ये विसर्जित होते. मीपणाच्या अज्ञानरूपी अंधारातून बाहेर आले की माणसाचा समष्टीकडे प्रवास सुरू होतो.

नव्हे ही समष्टी म्हणजेच मी अशी विश्वात्मक व्यापक जाणीव निर्माण होते. जी आपल्या संत ज्ञानदेव, एकनाथ, नामदेव तुकोबांच्या अंत:करणात निर्माण झाली. ही जाणीव कोणत्याही संवेदनाक्षम व्यक्तीस स्वस्थ बसू देत नाही. आजूबाजूचा व्यापक अंधार त्याला अस्वस्थ करतो. या अंधाराचे साम्राज्य किती प्रमाणात फैलावलेले असते नाही? अज्ञान, दारिद्र, विषमता, जातीय अहंता, वर्ण, वर्गव्यवस्था, स्त्रीपुरुषभेद, व्यसनाधीनता, विकारवशता, शोषण अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार, मिथ्या अभिमान, दाभिंक्ता, अंधश्रध्दा, कुपोषण, बेकारी, चंगळवाद, आभासी जगाचे आकर्षण, बेगडी प्रेम, वैचारिक, शारीरिक, सांस्कृतिक, आर्थिक मानसिक अशा सर्व प्रकारच्या अंधाराचा सामना आपणास दैनंदिन जीवनात करावा लागतो.

समाजजीवनातील हा काळोख मिटल्याशिवाय ज्ञानाची, विवेकाची, समतेची दिवाळी साजरी होईल का, हा खरा प्रश्न आहे. संत ज्ञानदेव म्हणतात, तिमिरावरूध्द जैसे । दृष्टींचे तेज भ्रंशे । मग पासीच असता न दिसे । वस्तुजात।' अशा सर्व प्रकारच्या विकारांनी, लालसेने, स्वार्थाने, जातीपातीच्या, धर्मभेदाच्या अहंतेने ग्रासलेले, भ्रांत झालेले मानवी मन सद्सद्विवेक हरवून बसते. तेव्हा अशा अविवेकी मनाला विवेकाचा लगाम घालण्याचे काम, त्यांना पुन्हा विवेकरूपी प्रकाशाच्या मार्गावर आणण्याचे कार्य मराठी संतांनी तेराव्या शतकापासूनच केले आहे.

नाचू कीर्तनाच्या रंगी । ज्ञानदीप लावू जगी' असे म्हणत ज्ञानरूपी दिव्यांचा प्रकाश निर्माण करण्याचे व दाही दिशांनी आसमंत प्रकाशमान करण्याचे तेजस्वी कार्य या महात्म्यांनी केले. अत्त दीप भव : असं म्हणणारे भगवान गौतम बुध्द असोत, समाजमनातील भीषण अंधाराबद्दलच आपली संवेदना प्रकट करून या अंधाराला भेदण्याचे कार्य केले. ज्ञानदेव म्हणतात त्याप्रमाणे, अविवेकाची काजळी । फेडूनी विवेकदीप उजळी। लोकमानसातील जातीपातींची, श्रेष्ठ कनिष्ठतेची, भेदभावाची ही अविवेकरूपी काजळी फेडून मानवतेचा विवेकदीप उजळायला हवा.

ज्या दिवशी आपण दिवाळी साजरी करून सर्व प्रकारचा आनंद लुटतो, विद्युत रोषणाईने सर्व परिसर चंदेरी झगमगाटात उजळून टाकतो, त्याच वेळी कित्येकांच्या घरात साधी पणतीही प्रकाशित झालेली नसते त्यांचे काय? तुकोबांच्याच भाषेत सांगायचे झाले तर समाजातील रंजलेल्या, गांजलेल्या, कष्टलेल्या, लोकांप्रती आपल्या मनात संवेदनेची धाकटी ज्योत तरी पेटायला नको का? अशा वंचित लोकांच्या जीवनात थोडा तरी ज्ञानाचा, सहानुभूतीचा, प्रकाश पेरण्याचे काम जेव्हा होईल, तेव्हाच खऱ्या अर्थाने समतेची दिवाळी साजरी होईल!

अंधश्रध्देच्या, कर्मकांडाच्या व घोर अज्ञान गुहेतून समाजातील सामान्य जनाला विवेकाच्या प्रकाशवाटेवर आणण्याचे काम मराठी संतांनी केले. ज्ञानराज माझी योग्याची माऊली । जेणें निगमवल्ली प्रगट केली । गीता अलंकार नाम ज्ञानेश्वरी । ब्रह्मानंदलहरी प्रगट केली । अध्यात्म विद्येचे दाविलेसे रूप । चैत्यन्याचा दीप उजळीला । नामा म्हणे श्रेष्ठ ग्रंथ ज्ञानदेवी । एक तरी ओवी अनुभवावी ।' संत ज्ञानदेवांनि खऱ्या अर्थाने महाराष्ट्रातील कष्टकरी, श्रमिक, दीनदलित लोकांच्या जीवनात अध्यात्माची, विठ्ठलभक्तीची दिवाळी व भावभक्तीची मंजुळ पहाट उगवण्याचे कार्य केले. या संतांच्या अक्षर अभंगातील चिरंतन सत्याने व शाश्वत मूल्यांच्या लावण्यदीपांनी अवघे मानवी जीवनच उजळून गेले!

(पान ४ वर)...




# WORLD PEACE DOME

## The WORLD'S BIGGEST DOME

Loni Kalbhor, Pune

Diameter 160 ft. Height 263 ft.



**Rahul V. Karad**
Executive President, MIT-WPU, Pune

The ***Philosopher Saint Shri Dnyaneshwara World Peace Dome that houses the World Peace Prayer Hall and the World Peace Library*** is the ***World's Largest Dome for Peace.***

It was conceptualized, planned, designed and executed over a period of 12 years by renowned visionary educationist Revered ***Prof. Dr. Vishwanath D. Karad.*** The dome conveys the message of world peace through a unique blend of science, spirituality and philosophy for the welfare of humankind.

***The iconic World Peace Dome features -*** 54 larger-than-life bronze statues of great saints, scientists, philosophers and founders of major religions.

The MAEER's group was established about 4 decades ago, and since then, Revered Prof. Dr. Vishwanath D. Karad's vision has empowered more than one lakh students who are now creating value for society.

Now, the mantle of leadership is being carried in the able hands of his son, ***Shri. Rahul V. Karad,*** the ***Executive President*** of ***MAEER's.*** Under his astute guidance, the group will certainly scale new heights.

Revered
**Prof. Dr. Vishwanath D. Karad**
UNESCO Chair Holder
President, MIT-WPU, Pune

MIT-WPU | Dr. Vishwanath Karad MIT WORLD PEACE UNIVERSITY | PUNE | unesco Chair



# दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!



**मा.ना.प्रा.डॉ.तानाजीराव सावंत**
सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री
महाराष्ट्र राज्य, तथा पालकमंत्री धाराशिव

**मा.प्रा.शिवाजीराव सावंत**
चेअरमन, शुगर वर्क्स लि., समुह
तथा संपर्क प्रमुख शिवसेना सोलापूर

**मा.धनंजय सावंत**
कार्यकारी संचालक
भैरवनाथ शुगर वर्क्स लि.,सोनारी
तथा जि.प.धाराशिव माजी उपाध्यक्ष

शुभेच्छुक : **भैरवनाथ शुगर वर्क्स लि.,**
शिवाजीनगर सोनारी, ता.परंडा, जि.धाराशिव



# दीपावलीनिमित्त शिवसेनेच्या वतीने हार्दिक शुभेच्छा!



राज्याचे मुख्यमंत्री
**मा.ना.श्री. एकनाथजी शिंदे**

शिवसेना जिल्हाप्रमुख
**श्री. चरणराज चवरे**

शिवसेना नेते
**श्री.दादासाहेब पवार**

शुभेच्छुक : **दादासाहेब पवार** शिवसेना नेते



देशपातळीवरील "सर्वोत्कृष्ट साखर कारखाना" म्हणून गौरविलेला व महाराष्ट्र शासनाचा "वनश्री व सहकार भूषण" पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेला

# कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखाना लि; श्रीपूर

ता.माळशिरस, जि.सोलापूर



मा.आ.श्री.प्रशांतराव परिचारक, चेअरमन

## कारखान्याची वैशिष्ट्ये

* सयुंक्त राष्ट्राकडून १० कोटी कार्बन क्रेडिट मिळवणारा भारतातील पहिला साखर कारखाना.
* कारखाना गोडाऊनवर ८० के.व्ही. सोलर प्रोजेक्टची निर्मिती.
* सुपंत माती व पाणी परिक्षण प्रयोगशाळा
* सुपंत जिवाणू खत प्रयोगशाळा.
* मानव विरहीत ऊस वजन काटा.
* वैद्यकीय सेवेसाठी ऑक्सिजन निर्मीती प्रकल्प
* सुपंत पॅकेज्ड साखर १,२,५,१० किलो मध्ये उपलब्ध.
* सपुंत ३०० एकर ऊस बेणे मळा.
* जिल्ह्यात सर्वाधिक ऊस दर देणारा कारखाना.
* जिल्ह्यात सर्वाधिक साखर विक्री दर.
* पाणी बचतीसाठी रेन हार्वेस्टिंग प्रकल्प
* पाणी पुर्नः वापरासाठी सी.पी.ओ. प्रणालीचा उपयोग
* कारखाना परिसरामध्ये ५0000 वृक्ष लागवड.

शुभ दीपावली

## देश व राज्य पातळीवरील पुरस्कार

* भारतातील सर्वोत्कृष्ठ साखर कारखाना पुरस्कार प्राप्त
* भारतीय शुगर यांचेकडून "सर्वोत्कृष्ठ कामगिरी" पुरस्कार प्राप्त.
* नॅशनल फेडरेशन यांचेकडून "तांत्रिक कार्यक्षमता" पुरस्कार प्राप्त.
* महाराष्ट्र शासनाचा "सहकार भूषण" पुरस्कार प्राप्त
* महाराष्ट्र शासनाचा "छत्रपती शिवाजी महाराज वनश्री" पुरस्कार प्राप्त.
* महाराष्ट्र राज्य ऊर्जा महामंडळ यांचेकडून "उर्जा संवर्धन पुरस्कार" प्राप्त.
* व्ही.एस.आय. पुणे यांचेकडून "बेस्ट मॅनेजींग डायरेक्टर" पुरस्कार प्राप्त
* व्ही.एस.आय. यांचेकडून "उत्कृष्ठ ऊस विकास पुरस्कार" प्राप्त.
* देश व राज्य पातळीवर विविध संस्थकडून एकूण ५१ पुरस्कार प्राप्त.



**श्री.कैलास खुळे**
व्हा.चेअरमन

**डॉ.यशवंत कुलकर्णी**
कार्यकारी संचालक

## सुपंत उत्पादने

सुपंत पॅकेज्ड साखर | सुपंत जैविक खते | सुपंत ऑक्सिजन



दीपावली व पाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा!

# कृषी उत्पन्न बाजार समिती, बार्शी ४१३४०१

Email : am_barshi@msamb.com
पोस्ट बॉक्स नं. २४ फोन-०२१८४-२२२९७६/२२२३५३

दक्षिणोत्तर भारताच्या लहान मोठ्या पेठाशी सचोटीने व्यापार करणारी व मराठवाड्याच्या प्रवेशद्वाराशी विनटलेली शेतकरी व व्यापारी यांची एकमेव विश्वासपात्र पेठ म्हणजेच कृषि उत्पन्न बाजार समिती बार्शीचे पंडीत जवाहरलाल नेहरु प्रिन्सिपल मार्केट यार्ड, बार्शी

मार्गदर्शक



मा.आ.राजाभाऊ राऊत

सभापती



मा.रणवीर राजेंद्र राऊत

## बाजार समितीची वैशिष्ट्ये

१) सर्व सोयीनीयुक्त प्रशस्त धान्य बाजार २ ) शेतमालाची उघड लिलाव पध्दतीने विक्री व त्वरीत चुकारा ३) ६० मे. टन क्षमतेचा भुईकाटा ४) जनावर बाजार ५) फळे भाजीपाला मार्केट ६) कडबा मार्केट ७) शॉपिंग सेंटर ८) कोल्ड स्टोअरेज ९) मालाचे योग्य वजन होण्यासाठी परवानाधारक तोलार १०) सुलभ शौचालय ११) जनावरासाठी निवारा शेड १२) ई - नाम योजना १३) शेतमाल तारण योजना १४) हमीभाव खरेदी केंद्र १५) गाडूळ खत प्रकल्प १६) धान्य चाळणी यंत्र व गोदाम १७) सौर ऊर्जा प्रकल्प १८) शेतकरी निवास १९) विविध औषधी वनस्पतीची लागवड व संवर्धन २०) संपूर्ण बाजार आवारामध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे


| श्री. तुकाराम अंबादास जगदाळे | श्री. झुंबर विनायक जाधव | श्री. रणवीर राजेंद्र राऊत |
|---|---|---|
| सचिव | उपसभापती | सभापती |

## संचालक

१) श्री. अभिमन्यू अर्जून डमरे
२) श्रीमती शालन विजय गोडसे
३) श्री. रावसाहेब बाबासाहेब मनगिरे
४) श्री. अरुण मच्छिंद्र येळे
५) श्री. अण्णासाहेब ज्ञानदेव कोंढारे
६) श्री. राजेंद्रकुमार वसंतराव गायकवाड
७) श्री. अनिल विठ्ठल जाधव
८) सौ. प्रभावती अशोक काळे
९) श्री. महादेव श्रीरंग चोरघडे
१०) श्री. काशिनाथ भगवान शेळके
११) श्री. सचिन आबा जगझाप
१२) श्री. वासुदेव तात्याराम गायकवाड
१३) श्री. बुबासाहेब श्रीमंत घोडके
१४) श्री. कुणाल दिलीप घोलप
१५ ) श्री. साहेबराव शहाजीराव देशमुख
१६) श्री. चंद्रकांत सदाशिव मांजरे
१७) मा. जिल्हा उपनिबंधक सह संस्था, सोलापूर
१८) मा. सहाय्यक निबंधक सह.संस्था, बार्शी

सौजन्य : व्यापारी मित्रमंडळ, बार्शी





दीपावली व नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!



शुभेच्छुक.............................

# प्रशांत एस. पैकेकर

सिव्हील इंजिनियर अँड गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर, बार्शी. मो. ९४२२४५८५८८



# जिल्हा परिषदेच्यावतीने तमाम सोलापूरकरांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

जेव्हा होईल प्रदूषणमुक्त दिवाळी,
तेव्हा होईल सगळीकडेच खुशाली,
जेव्हा होतो पणत्यांनी उजेड तर
कशाला हवा फटाक्यांचा पसारा


शुभ दीपावली!

शुभेच्छुक

जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,
जिल्हा परिषद बांधकाम विभाग,
जिल्हा परिषद स्वच्छ भारत अभियान,
जिल्हा परिषद शिक्षण विभाग,
जिल्हा परिषद महिला बालकल्याण विभाग,
जिल्हा परिषद समाज कल्याण विभाग



# दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा!



मागण्या मान्य केल्याबद्दल शिक्षणमंत्री मा. दीपकजी केसरकर साहेबांचा सत्कार करताना राज्य सरचिटणीस निलेश देशमुख सर.

दिपावलीच्या शुभक्षणांनी आपली सारी स्वप्नं साकार व्हावी,
ही दिवाळी आपल्यासाठी एक अनमोल आठवण ठरावी,
आणि त्या आठवणीने आपंलं आयुष्य अधिकाधिक सुंदर व्हावं.
दिवाळीच्या लक्ष लक्ष शुभेच्छा !!



मा. संतोष पिट्टलवाड
राज्याध्यक्ष, शिक्षक सहकार संघटना, महाराष्ट्र राज्य



मा. विशाल नाईक
जिल्हा संघटक, शिक्षक सहकार संघटना, महाराष्ट्र राज्य



शुभेच्छुक :

## मा.विशाल नाईक

जिल्हा संघटक शिक्षक सहकार संघटना, महाराष्ट्र राज्य



दिवाळीत टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ गोष्टी कशा निर्माण करता येतील आणि त्या तितक्याच आकर्षक कशा वाटतील हे शिकवण्यासाठी आपले घरातील ज्येष्ठ नागरिक प्रयत्न करत असतात, जेणेकरून घरच्याच काही टाकाऊ गोष्टींपासून आकर्षक अशी एखादी सुंदर वस्तू आपण बनवू शकतो, हे ते आपल्या नातवंडांना पटवून देत असतात आणि हीच फॅशन पिढ्यानपिढ्या चालत आली आहे बरे का. काळानुरूप त्या आकाश कंदिलाचे तसे स्वरूप बदलत असते, पण त्यामागची संकल्पना एकच की आपण आपल्या हाताने एखादी चांगली कलाकृती घडवू शकतो, हा एक संदेशच दिला जातो असे म्हणा ना.

# फॅशनेबल दिवाळी

फॅशनेबल दिवाळी, शीर्षक वाचून जरा आश्चर्य वाटले असेल ना? वाटले असेल ना, काय हरकत नाहीये, पण आजकाल प्रत्येक गोष्टींची फॅशनच झाली आहे. सण अगदी मोठ्या प्रमाणात साजरे करायचे. आपल्याकडे अनेक सण आहेत आणि अनेक सण उत्साहाने आपण साजरे करत असतो. तसंच दिवाळी हा खूप मोठा सण आपल्याकडे मानला जातो आणि तो तितक्याच मोठ्या प्रमाणात साजरा केला गेला पाहिजे असा आपल्या सगळ्यांचा आग्रह असतो आणि मग तो का नसावा? कारण दिवाळी साजरी करण्यामागचं कारणही तितकच मोठं आहे. जे ऐतिहासिक कारण आहे ते तर सगळ्यांना माहिती आहेच, असं मी गृहीत धरते हं. बरं ज्यांना म ाहीत नाही त्यांच्यासाठी मी जरा परत एकदा सांगते थोडक्यात. की जेव्हा भगवान श्रीराम १४ वर्षांचा वनवास भोगून आले आणि त्याशिवाय रावणाचा वध करून आयोध्याला परत आले तो उत्साह साजरा करण्यासाठी म्हणून ही दिवाळी दरवर्षी आपण साजरी करतो. अनेक ठिकाणी फराळाचे बनते.

म्हणजे चिवडा, लाडू, करंजी, चकल्या, अनारसे असे एक काय अनेक पदार्थ बनवले जातात घराघरांमध्ये. शिवाय संध्याकाळच्या वेळात सगळीकडे दिवे लावले जातात. पणत्या लावल्या जातात. मग अजून थोडासा उत्साह वाढण्यासाठी अनेक ठिकाणी फटाकेदेखील फोडले जातात. अनेक ठिकाणी काय मी तर म्हणते प्रत्येक घराघरांमध्ये फटाक्यांची आतषबाजी होत असते. यात लहान मुलांपासून मोठ्या माणसांपर्यंत किंवा आपण म्हणूयात वयोवृद्धांपर्यंत सगळी घरातील मंडळी अगदी उत्साहाने सहभागी होत असतात. आपलं त्याला ऐतिहासिक कारणही असंच आहे ना. ही ऐतिहासिक कथादेखील परंपरेनुसार प्रत्येक घराघरांमध्ये सांगितली जाते. त्यामुळे तो उत्साह तसाच कायम टिकून राहावा हा त्यामागचा उद्देश.

पिढ्यानपिढ्या यांचे पालन करावे हीच एक सगळ्यांना इच्छा असते. पूर्वीच्या काळी बाजारात जाऊन सहज शक्य नाही व्हायचं हो, नवीन नवीन कपडे घ्यायला, गोडधोड घरात करायला किंवा रोज उठून लोकांना बोलवून काही छान छान पदार्थ खाऊ घालणं हे त्यावेळेस सहज शक्य नव्हतं, तर दिवाळी किंवा असे सण त्यानिमित्तानेही साजरे केले जातात. जेणेकरून चार लोकांना बोलावून हा उत्साह द्विगुणीत करावा हा त्यामागचा उद्देश. ही परंपरा उत्साहाने तशीच चालत राहावी यासाठी घरातील प्रत्येक जण झटत असतो. प्रत्येक जण उत्साहाने नवीन नवीन काहीतरी कल्पना रचत असतो. जसे आपल्याकडे बनवलेले पणत्यांचे दिवे घराघरात बघायला मिळतात तसेच घरातील वयस्कर मंडळी नातवंडांना घेऊन आकाश कंदीलदेखील तितक्याच उत्साहाने बनवत असतात.

बऱ्याचदा हा आकाश कंदील टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ गोष्टी कशा निर्माण करता येतील आणि त्या तितक्याच आकर्षक कशा वाटतील हे शिकवण्यासाठी आपले घरातील ज्येष्ठ नागरिक प्रयत्न करत असतात, जेणेकरून घरच्याच काही टाकाऊ गोष्टींपासून आकर्षक अशी एखादी सुंदर वस्तू आपण बनवू शकतो, हे ते आपल्या नातवंडांना पटवून देत असतात. हीच फॅशन पिढ्यानपिढ्या चालत आली आहे बरं का. काळानुरूप त्या आकाश कंदिलाचं तसं स्वरूप बदलत असतं, पण त्यामागची संकल्पना एकच की आपण आपल्या हाताने एखादी चांगली कलाकृती घडू शकतो, हा एक संदेशच दिला जातो असं म्हणा ना. खरोखरंच एक आदर्श घेणारी गोष्ट आहे. यामागचे उद्दिष्ट लक्षात घेतलं तर खरोखर वाखाणण्यासारखी ही गोष्ट आहे.

याशिवाय आजकाल बाजारातही सगळ्या गोष्टी मि ळतात. हो गोडधोड खाण्याच्या किंवा विविध नमकीन किंवा मिठाईची दुकानं असतात, पण घरी करण्यामागचा उद्देश एकच, एकतर घरचं अन्न खाल्लं जातं. घरच्यांची किंमत राहते आणि त्यामागे लागणारे कष्ट किंवा त्याची गोडी ही वेगळीच असते हे पटवून देण्याचा त्याम ागचा उद्देश. याच्या व्यतिरिक्त आपण बघतो की घराघरांमध्ये विविध प्रकारचे फटाके किंवा आतषबाजीच्या गोष्टींदेखील विकत घेतल्या जातात. काही काही लोक म्हणतात की, इको फ्रेंडली असावं. पर्यावरणाचा किंवा निसर्गाचा ऱ्हास होऊ नये याची काळजी घेतली जावी, पण दिवाळी वर्षातून एकदाच येते. मग का नाही हो फटाके उडवायचे? का नाही आपण ती आतषबाजी करायची? आपला उत्साह मोठ्या प्रमाणात का नाही साजरा करायचा? तर तो केलाच पाहिजे.

फटाक्यांना माझा मुळीच विरोध नाही. हा त्याचे प्रमाण कसे असावे, किती असावे हे व्यक्तीसापेक्ष. आपण नवीन वर्षाच्या सुरुवातीला फटाके उडवतो. एखादी क्रिकेटची मॅच जिंकलो तर फटाके उडवतो. कोणी निवडून आलं तर फटाके उडवतो. इतर अनेक गोष्टींसाठी फटाके उडवतो. आपण गाड्या चालवत असतो. थोडंसं जरी अंतर जायचं असेल तर आपण चालत नाही तर गाड्या वापरतो. तेव्हा नाही का हो प्रदूषण होत? होतच की. जर वर्षभर या सगळ्या गोष्टींची काळजी घेतली तर दिवाळीच्या आतषबाजीला आपण बिलकुल विरोध करणार नाही.

म्हणून मला वाटतं प्रदूषण टाळण्यासाठी फटाके न उडवणे हा काही एकमेव पर्याय नाही. आपण जर वर्षभर काळजी घेतली तर या सगळ्या प्रदूषणाची वेळच येणार नाही, असं माझं स्पष्ट मत आहे. त्यामुळे हे म्हणायची फॅशन टाळा बाबा की दिवाळीत फटाके उडवायचे नाही. दिवाळीत फटाके उडवले तर प्रदूषण होतं. वर्षातून एकदा ती येणारी दिवाळी. त्यातले दोन किंवा जास्तीत जास्त तीन दिवस फटाके वाजवले जातात, पण वर्षभर गाड्यांचा धूर, कंपन्यांचा धूर, शिवाय इतर वेळी केलेली आतषबाजी या सगळ्यांचं प्रमाण कमी केलं ना तर आपण एकुलत्या एका दिवाळीत अगदी उत्साह साजरा करू शकतो बरं का.





## मनात संवेदनेची धाकटी ज्योत तरी पेटायला हवी!

(पान १ वरुन..)

त्यामुळेच विवेकनिष्ठ विचारांच्या अधिष्ठानावर तेवणारा हा संतसाहित्याचा नंदादीप मराठी संस्कृतीचाच नव्हे, तर भारतीय संस्कृतीतील अमूल्य ठेवा ठरतो.

ज्ञानदेवांचे पसायदान असो की नामयाचे कीर्तन, एकनाथांचे भारुड असो की तुकोबांचे अक्षर अभंग या संताच्या विचारदीपानी अवघे विश्वच प्रकाशमान झाले. या विचारांना स्थळ, काल, प्रदेशांच्या सीमारेषा कधीच आड आल्या नाहीत. त्या भेदून हा ज्ञानप्रकाश विश्वव्यापक बनला. विश्वाच्या कल्याणकारी विचाराला, ज्ञानाला व त्याच्या निर्मात्याला कोणतीच मर्यादा बाधत नाही. हे ज्ञान व देणारा ज्ञाता हा कोणत्याही एका धर्माचा किंवा राष्ट्राचा नसतो. ता वैश्विक सत्य मांडत असतो म्हणूनच तो सर्व विश्वाचा असतो. संत तुकारामांनी याचे खूप समपर्क उदाहरण दिले आहे.



ते म्हणतात, दीप न देखे अंधार । आता हेची करा जतन ।' दिव्याचा हा गुणधर्म असतो म्हणूनच प्रकाशाचे पूजन करायला हवे, परंतु दिवे लावूनही समाजजीवनात विविध प्रकारचा अंधार राहत असेल तर हा सण केवळ प्रतीकात्मकच राहतो. प्रकाशाचे प्रतीकात्मक पूजन करताना मी माझ्या आजूबाजूच्या सर्व अंधाराचा नायनाट करीन ही भावना जोपासायला हवी.

संतांची दिवाळी कशी होती? हा सण प्राचीन काळापासून साजरा केला जातो. त्यामागे काही पौराणिक संदर्भही आहेत. संत साहित्यातही दिवाळसणाचे संदर्भ आले आहेत, सण दिवाळीचा आला । नामा राउळाशी गेला । या अभंगातून संत जनाबाईने दिवाळसणाचे मनोहारी वर्णन केले आहे. तुकाराम याबाबत म्हणतात, दसरा दिवाळी तोचि माझा सण । सखे हरिजन भेटतील । आमुप जोडल्या पुण्याचिया राशी । पार त्या सुखाशी नाही लेखा । धन्य दिवस आजी झाला सोनियाचा । पिकली हि वाचा रामनामे ।' संत संगती व सज्जनाचा सहवास हीच आपल्यालेखी दिवाळी असे तुकोबा म्हणतात. जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले । तोचि साधू ओळखावा । देव तेथेची जाणावा । अशी त्यांची देव व भक्ति याबाबतची धारणा होती.

साधुसंत येती घरा तोचि दिवाळी दसरा हीच धारणा पुढे समाजमनातही पेरली गेली, पण तोचि साधू ओळखावा, हा तुकोबांचा भाव आपण समजू शकलो नाहीत. त्यामुळे बाह्य वेषधारी साधूने पुन्हा समाजाम ध्ये भक्तिचे अवडंबरच माजवले. वेगळ्या मार्गाने शोषणच केले. अशा सर्व प्रकारच्या व सर्व क्षेत्रातील बेगडीपणापासून, सावध होऊन जेव्हा आपण सद्सद्विवेकबुद्धीच्या कसोटीवर वर्तमानाची नोंद घेऊ तेव्हाच ज्ञानाची दिवाळी उजाडू शकते, नाहीतर शतकानुशतकांचा घोर अंधार अजून संपलेला नाही. उलट तो अधिक तीव्र व व्यापक होतोय की काय? अशी खऱ्या संवेदनाक्षम व मानवतावादी विचार करणाऱ्यांना भीती वाटू लागलीय ! आजचा समाज ज्या सामाजिक, वैचारिक कोंडीतून जातोय ! ही कोंडी फोडायची असेल तर सुसंस्कृत विवेकाची पेरणी व मानवतेच्या दीपावलीसाठी आपल्या भारतीय परंपरेतील दीपस्तंभाकडे पहावे लागेल.

त्यांच्या विचारांच्या प्रकाशात पुढील वाटचाल करावी लागेल! समग्र विश्वाला ज्यांनी प्रकाशम ान केले त्या अनेक महात्म्यांचा शांततेचा, सर्वात्मकतेचा, सत्य, अहिंसा, शांती व करुणेचा मूलमंत्र पुन्हा एकवार आचरणात आणावा लागेल ! विविध धर्मसंप्रदायाने व त्यांच्या प्रेषितांनी मानवी कल्याणाची चिंता वाहिली, अत्त दीप भव।' म्हणून बुद्धांनी निर्वाणाच्या वेळी आपल्या अंत:करणातील रत्नदीप प्रज्वलित करण्याचा प्रेमळ संदेश दिला, त्याशिवाय सत्याचा, ज्ञानाचा, प्रकाश कसा प्रदीप्त होणार? अंतरीचा दिवा विझलेला असेल, तर बाहेर लक्षावधी दीपमाळा लावून उपयोग काय? तेव्हा खरी गरज आहे ती विवेकनिष्ठ विचारांच्या तेजोमय दीपावलीची!













